भारताचे राजपत्र

सी.जी.डी.एल.अ-5062020-219745

असाधरण

भाग-दोन खंड-1

प्राधिकरणाद्वारे प्रकाशीत

संख्या-151 नवी दिल्ली, रविवार दिनांक 27 सप्टेंबर 2020/अश्विन 15, 1942 शके

संसदेने पारीत केलेल्या खालील कायद्रयास भारताच्या राष्ट्रपतींनी दिनांक 24 सप्टेंबर 2020 रोजी स्विकृत केला असून तो याद्धारे सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत येत आहे.

विधी व न्याय मंत्रालय

विधी विभाग

संख्या-151 नवी दिल्ली, रविवार दिनांक 27 सप्टेंबर 2020/अश्विन 15, 1942 शके

# शेतक-यांचे उत्पादन, व्यापार आणि वाणिज्यीक (उन्नती व सुविधा) कायदा, 2020

क्रमांक 21/2020

शेतकरी आणि व्यापारी यांना आपले उत्पन्नास खरेदी विक्री करिता त्यांचे सोईनुसार विक्री तथा खरेदि करण्यांचे स्वातंत्र्य, ज्यामुळे त्यांना स्पर्धात्मक व पर्यायी व्यापाद्वारे किफायतशीर किंमती प्राप्त होती, ज्याद्वारे ते कार्यक्षम, पारदर्शी आणि कोणत्याही अडथळयाविना आंतरराज्यीय आणि राज्यांतर्गत व्यापार आणि वाणिज्यीक शेतक-यांचे उत्पादन,मंडई बाहेरच्या क्षेत्रात किंवा विविध राज्यांच्या राज्य उत्पादक संघाच्या कायद्याद्वारे स्थापित बाजाराच्या मानिव क्षेत्रात, साचेबध्द व सुकर व्यवसाय इलेक्ट्रॉनिक व्यवसाय आणि त्याचेशी निगडीत व्यापार किंवा तदनुषंगिक बाबीं पुरविण्याकरिता कायदा –

भारतीय प्रजासत्ताकाच्या एक्काहत्तराव्या वर्षात संसदेने अधिनियमीत केलेला कायदा खालील प्रमाणे -

## प्रकरण क्रमांक -1

## (प्रारंभिक)

1. (1) या कायदास शेतक-यांचे उत्पादन, व्यापार आणि वाणिज्य (चालना आणि सुविधा) कायदा, 2020 म्हटले जाईल.

संक्षिप्त शिर्षक,प्रारंभ

(2) हा कायदा दिनांक 5 जून 2020 पासून अंमलात येईल.

2. या कायदात, संदर्भ अन्यथा आवश्यक नसल्यास –

(अ) 'शेतक-यांचे उत्पादन', म्हणजे –

व्याख्या

(1) अन्नसामुग्री ज्यामध्ये धान्य जसे गहु , तांदूळ,किंवा जाड दाणे, डाळी, खाद्य तेले, तेल, भाजी, फळे, कवचफळे, उस अणि कुक्कुटपालन, सुकरालय, शेळीपालन, मत्स्यपालन आणि दुग्धजन्य पदार्थ पक्रीया केलेले किंवा नैसर्गीक प्रकारामधील मानवी वापरासाठी उत्पादने

(2) ढेपेसह पशुखाद्य आणि इतर सत्व , आणि

(3) कच्चा, सरकी काढलेला किंवा न काढलेला कापूस सरकी, आणि कच्चे ताग,

(ब) 'इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहाराचे व्यासपीठ' म्हणजे प्रत्यक्ष आणि ऑनलाईन खरेदि-विक्री करिता, शेतक-यांचे उत्पादनासाठी व्यापार व वाणिज्यीक व्यापाराचे संचालन करण्याकरिता उपलब्ध करुन दिलेले व्यासपीठ, जे इलेक्ट्रॉनिक यंत्रांद्वारे आणि इंटरनेटचा वापर करुन, ज्याठिकाणी असा प्रत्येक व्यवहार शेतक-यांच्या उत्पादनाचे वितरण/वाटपात होईल.

(क) ‘शेतकरी’ म्हणजे असा व्यक्ति जो स्वतः किंवा भाडयाच्या मजूरांद्वारे किंवा कोणत्याही मार्गाने शेतातून उत्पन्न घेतो आणि यांत शेती उत्पादक संस्थांचा समावेश राहील.

(ड) ‘शेती उत्पादक संघटना’ म्हणजे शेतक-यांची किंवा गट जो कोणत्याही नावाने ओळखला जाई.

(1) जो अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत नोंदणीकृत असेल, किंवा

(2) केंद्र किंवा राज्य शासनाच्या मदतीने कोणत्याही योजना अथवा कार्यक्रमाद्वारे पुरस्कृत,

(इ) ‘आंतरराज्यीय व्यापार’ म्हणजे शेतक-यांचा माल विकत घेणे किंवा विक्री करणे ही क्रिया जेथे एका राज्याचा व्यापारी इतर राज्याच्या शेतक-यांकडून किंवा व्यापा-याकडून शेतमाल विकत घेऊन तो शेतमाल इतर राज्यात, शेतमाल विकत घेतलेल्या राज्या व्यतिरिक्त किंवा जेथे अशा शेतक-यांच्या मालाचा उगम झाला असेल त्या व्यतिरिक्त

(फ) ‘राज्यांतर्गत व्यापार’ म्हणजे शेतक-यांचे उत्पादन खरेदि करण्याची किंवा विक्री करण्याची प्रक्रिया जेथे एका राज्याचा व्यापारी शेतक-याचे उत्पादन त्याच राज्याच्या शेतक-याकडून किंवा व्यापा-याकडून विकत घेणे ज्यात व्यापारी शेतक-यांचे असे उत्पादन विकत घेईल किंवा जेथे अशा शेती शेती उत्पादनाचा उगम झाला असेल.

(क) ‘अधिसूचना’ म्हणजे, केंद्र शासन किंवा राज्य शासनाने कार्यालयीन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेली

अधिसूचना आणि त्यामधील शब्दप्रयोग अधिसूचीत केलेले किंवा अधिसूचीत तसाच अन्वयार्थ असतील-

(ख) व्यक्ति यामध्ये –

अ) व्यक्ति ,

आ) भागीदारी संस्था,

इ) कंपनी,

ई) मर्यादित दायीत्व असलेली भागीदारी,

उ) सहकारी संस्था

ऊ) सोसायटी किंवा

ए) कोणतीही संघटना किंवा व्यक्तिंची अशी नोंदणीकृत संस्था ज्यास केंद्र किंवा राज्य शासनाच्या चालु असलेल्या कार्यक्रमासाठी मान्यता देण्यांत आली आहे.

(ग) 'विहीत' म्हणजे केंद्र शासनाच्या या अध्यादेशांतर्गत विहीत केलेले नियम ,

(घ) 'अनुसूचीत शेतकरी उत्पादन' म्हणजे असे कोणतेही कृषी उत्पादन जे राज्य कृषी उत्पन्न बाजार समिती अधिनियमांतर्गत नियंत्रणाकरिता विनियमीत केलेले आहे.

(न) 'राज्य' यात केंद्रशासीत प्रदेशाचा समावेश आहे.

च) 'राज्य कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा' म्हणजे भारतातील राज्याच्या किंवा केंद्र शासीत प्रदेशाच्या विधिमंडळाने संमत केलेला कायदा, ज्याचे नांव

काहीही असले तरी, मात्र व्यापार क्षेत्रात ज्याद्वारे राज्यात कृषी उत्पन्नाकरिता बाजार विनियमीत केलेला आहे.

1) कृषीक्षेत्र द्वार

2) कारखान्याची जागा

3) वखार

4) सायलो (गुरांसाठी चारा गोळा करण्यासाठी ठेवलेले कोठार)

5) शीतगृहे, किंवा

6) इतर कोणतीही जागा किंवा ढाचा

ज्या ठिकाणाहून व्यापा-यांना कृषी उत्पादनाचा व्यापार करता येईल असे भारतातील ठिकाण परंतू ज्यामध्ये कुंपन घातलेले क्षेत्र, बंदिस्त ठीकाणाचा आणि ढाचा समाविष्ट असणार नाही, ज्यात

अ) मुख्य बाजार तळाची भौतिक सिमा, उप बाजार तळ, बाजाराचे दुययम आवार जे भारतातील कोणत्याही राज्याच्या कृषी उत्पन्न बाजार अधिनियमांतर्गत असून बाजार समितीद्वारे चलीत आहे व त्यांचेच व्यवस्थापनांतर्गत आहे.

आ) खाजगी बाजार तळ, खाजगीउप बाजार तळ, प्रत्यक्ष पणन संकलन केंद्र आणि खाजगी कृषी ग्राहक बाजारतळ ज्याचे व्यवस्थापन परवानाधारक व्यक्ति किंवा कोणतेही वखार, कोठार, शितगृहे किंवा

बाजार क्षेत्र म्हणून अधिसूचीत ढाचा किंवा मानिव बाजार क्षेत्र जे बाजार म्हणून किंवा मानीव बाजार म्हणून भारतात अंमलात असलेल्या प्रत्येक राज्याच्या राज्य कृषी उत्पन्न बाजार समिती अधिनियमांतर्गत अधिसूचीत केले असेल असे बाजार.

छ) व्यापारी म्हणजे असा व्यक्ति जो आंतरराज्यीय व्यापार किंवा आंतरराज्य व्यापाराचे माध्यमातून किंवा दोहोंची सांगड घालून स्वतः किंवा एका किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या वतीने साठी घाऊक किंवा किरकोळ व्यापाराचे उद्येशाने उपयोगासाठी किंवा मुल्य संवर्धनासाठी, प्रक्रीया करणेसाठी, निर्मिती करणेसाठी, निर्यात, उपभोग अशा कोणत्याही उद्यिष्टांसाठी कृषी उत्पादन खरेदी करतो असा व्यक्ती ,

**प्रकरण**-2

<u>**कृषी उत्पादनाचा व्यापार आणि वाणिज्यीक ला चालना व सुविधा**</u>

3. या कायदातील तरतूदिंचे अधिन राहून, कोणताही शेतकरी किंवा व्यापारी, किंवा इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहाराचे व्यासपीठ यांना आंतरराज्यीय व आंतरराज्य व्यापार आणि वाणिज्यीक कृषी उत्पन्नाचा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य राहील. (व्यापार क्षेत्रत व्यापार आणि वाणिज्यीक बाबींकरिता स्वातत्र्य)

4. (1)कोणताही व्यापारी आंतरराज्य व आंतरराज्यीय व्यापाराचे माध्यमातून अधिसूचीत शेतकरी उत्पादनाचा व्यापार शेतक-यांसमवेत अथवा व्यापार क्षेत्राबाहेरील कोणत्याही व्यापा-यासोबत करु शकेल.

परंतू शेती उत्पादक संस्था किंवा कृषी सहकारी संस्थांशिवायकोणताही व्यापारी कोणतेही अधिसूचीत शेतकी उत्पादन, त्या व्यापा-याकडे 1981 च्या आयकर कायद्यांतर्गत जारी केलेले स्थायी खाते क्रमांक किंवा तत्सम अन्य कोणतेही दस्तऐवज

जे केंद्र शासनाने अधिसूचीत केलेले ते असल्याशिवाय व्यापार करु शकणार नाही.

(2) केंद्र शासन, जनहिताच्या दृष्टिने व्यापा-यांच्या इलेक्ट्रॉनिक नोदणीकरिता एक यंत्रणा असावी तसेच व्यापाराच्या व्यवहारासाठी कार्यपध्दती आणि व्यापार क्षेत्रामध्ये अधिसूचीत शेतकरी उत्पादनासाठी भुगतानाची कार्यपध्दती असावी या मताचे असेल तर ती प्रणाली स्थापित करता येईल.

(3) प्रत्येक व्यापारी जो शेतक-यांशी व्यवहार करीत आहे त्याने अधिसूचीतशेतकी उत्पादनाचे प्रदान त्याच दिवशी अथवा जास्तीत जास्त तीन कामाचे दिवसात करेल परंतू शेतकी उत्पादन प्रत्यक्ष पोहोचण्याच्या अटीचे अधिन राहून शेतक-याला आवश्यक भुगतान त्याच दिवशी करेल.

परंतू केंद्र शासन, शेतकी उत्पादक संस्था किंवा कृषी सहकारी संस्था असे कोणतेही नामाभिधान असेल, त्यांचे मार्फत प्रदानाची वेगळी पध्दत अलंबवू शकेल व ती पध्दत खरेदिदारास वस्तुंचा पुरवठा झालेला आहे याचेशी संलग्नीत असेल.

(5) (1) कोणतीही व्यक्ति ज्यांचेकडे 1961 च्या आयकर कायद्यांतर्गत जारी केलेला स्थायी खाते क्रमांक किंवा त्यासारखेच दुसरे दस्तऐवज जे केंद्र शासनाने अधिसूचीत केलेले आहे ती शेती उत्पादक संस्था किंवा कृषी सहकारी संस्था इलेक्ट्रॉनिकव्यापार आणि व्यावसायीक व्यासपीठ स्थापित करु शकेल ज्याद्वारे ते अधिसूचीत शेतकी उत्पादनाचा आंतरराज्यीय व आंतरराज्य व्यापार आणि वाणिज्जीक व्यवहार करु शकेल.

परंतू, इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यावसायीक व्यासपिठावरुन व्यापार करणारी व्यक्ति वैध व्यापारासाठी असलेल्या मार्गदर्शक सूचनांचा,जसे व्यापाराची पध्दत, शुल्क इतर

व्यसपिठासोबत आंतर-व्यवहार्यता, वाहतुकीची व्यवस्था,गुणवत्तेचे परिक्षण, वेळीच प्रदान, व्यपाराचे ठिकाणच्या स्थानिक भाषेतून मार्गदर्शक सूचनांचा प्रसार आणि इतर बाबींचे पालन करेल.

(2)जनतेच्या हितासाठी हे आवश्यक आणि फायद्याचे आहे असे केंद्र शासनाचे मत झााले असल्यास, केंद्र शासन इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपिठाचे नियमानूसार –

अ) कार्यपध्दती, निकष आणि नोंदणीची रीत निश्चित करेल आणि,

ब) आचार संहिता,तांत्रिक मानके, आंतर व्यवहार्यतेसह इतर व्यासपिठे आणि वाहतुक व्यवस्थेसह अनुसूचीत शेतक-यांच्या उत्पादनाच्या गुणवत्तेचे परिक्षण व प्रदान पध्दती विर्निदिष्ट करावी.

अधिसूचीत शेतकी उत्पादनाचा आंतरराज्यीय व आंतरराज्य व्यापार वाणिज्यीक क्षेत्रामध्ये सुकर करण्यासाठी.

(6) कोणत्याही राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीद्वारे किंवा राज्यातील इतर कोणत्याही कायद्यांतर्गत कोणत्याही नावाने कोणतेही बाजार शुल्क किंवा दंड किंवा उप कराची आकारणी अनुसूचीत शेतक-यांच्या उत्पादनावर इलेक्ट्रॉनिक व्यापार व व्यवहारासाठी व्यासपिठावर कर आकारणी करता येणार नाही.

| व्यापार क्षेत्रामध्ये राज्य कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा इ. अंतर्गत फी |
| --- |

(7) (1) केंद्र शासन, केंद्र शासनाच्या कोणत्याही संघटनेमार्फत शेतक-यांच्या उत्पादनांच्या किंमतीचीमाहिती आणि बाजार विषयक बाबींची माहिती यंत्रणा विकसीत करुन त्यासंबंधीत माहितीच्या प्रसारासाठी एक साचा/ चौकट विकसीत करु शकते.

| किंमतीची माहिती आणि गुप्तवार्ता प्रणाली |
| --- |

(2) केंद्र शासन, इलेक्ट्रॉनिक व्यापार व वाणिज्यीक व्यासपिठ स्वामित्वधारक व कार्यवाही करणारी कोणतीही व्यक्ति विहीत करण्यांत आलेल्या व्यवहारांचीमाहिती पुरविण्यासाठी आवश्यकता असू शकते.

स्पष्टिकरण – या कलमाचे प्रयोजनाकरिता केंद्र शासनाची संस्था या शब्दप्रयोगामध्ये दुययम किंवा संलग्न कार्यालये शासनाच्या मालकीची किंवा प्रचलीत कंपनीकिंवा संस्था अंतर्भूत आहे.

## प्रकरण – 3
## विवादाबाबत निर्णय

(8) (1)या कायदाचे कलम 4 अंतर्गत शेतकरी आणि व्यापारामधील व्यवहारामुळे काही विवाद उदभवल्यास दोन्ही पक्ष उप विभागीय दंडाधिकारी यांचे कडे अर्ज दाखल करुन परस्पर सामंजस्याने तोडगा काढू शकतात, जो हा विवाद सोडविण्याकरिता प्रकरण, त्यांनीच स्थापित केलेल्या समेट मंडळाकडे, पाठवून त्यावर बंधनकारक तोडगा काढू शकतो.

(2)पोट कलम (1) अन्वये उप विभागीय दंडाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या प्रत्येक समेट मंडळामध्ये अध्यक्ष आणि उप विभागीय दंडाधिकारी यांना जे योग्य वाटेल अशा सदस्यांचा समावेश असेल जे दोनपेक्षा कमी नसतील व चार पेक्षा जास्त नसतील.

(3)अध्यक्ष हा उप विभागीय दंडाधिकारी यांच्या अधिपत्याखाली कार्यरत अधिकारी असेल आणि प्रत्यंक पक्षाचे समान प्रतिनिधी इतर सदस्य असतील जे त्यांचे प्रतिनिधीत्व करतीलआणि ती व्यक्ति पक्षाच्या शिफारसीवरुच नेमल्या जाईल.

परंतू जर कोणताही पक्ष सात दिवसाचे आंत अशी शिफारस करण्यांत अपयशी ठरला तर उप विभागीय दंडाधिकारी

अशा पक्षाचे प्रतिनिधीत्व करण्यास योग्य वाटेल अशा व्यक्तिंचीनेमणूक करेल.

(4)कोणत्याही वादाचे बाबतीत, समेटाच्या प्रक्रियेचे वेळी तोडगा निघतो, त्यावेळी समझोत्याचे ज्ञापन तयार करुन ज्यावर दोन्ही पक्षांची स्वाक्षरी असेलआणि सर्व पक्षांना बंधनकारक असेल.

(5)उप कलम (1) अन्वये व्यवहार करण्यासाठीअसलेले पक्षजर या कलमांतर्गत ठरवून दिल्याप्रमाणे तीस दिवसांचे आंत विवाद सोडविण्यास असमर्थ असतील तर त्यांनी संबंधीत उप विभागीय दंडाधिकारी जे उप विभागीय प्राधिकरण असेल त्यांचेकडे जावे.

(6)उप विभागीय प्राधिकरण स्वतःच समावेदनाने किंवा प्राप्त याचिकेकेद्वारे किंवा कोणत्याही शासकीय अभिकरणाकडील संदर्भान्वये कलम (4) च्या उल्लंघनाची दखल घेणेबाबत प्राप्त किंवा त्याअंतर्गत नियमांची दखल घेईल आणि उप कलम (7) अंतर्गत कारवाई करेल.

(7)उप विभागीय प्राधिकरण या कलमांतर्गत विवाद किंवा उल्लंघनाविषसी निर्णय झोण्याच्या तारखेपासून 30 दिवसांचे आंत संक्षिप्त पध्दतीने निर्णय घेईल आणि पक्षांना सुनावणीची संधी दिल्यानंतर, ते कदाचित –

(अ)विवादाधीन असलेल्या रकमेचे वसुली करिता आदेश निर्गमित करतील, किंवा

(ब)कलम (11) च्या उप कलम (1) मध्ये दर्शविल्याप्रमाणे दंड आकारतील.

(क)अनुसूचीत शेतकी उत्पादनाचे विवणनास मनाई करण्याबाबत च्या कोणत्याही उपक्रमास वाणिज्जिक विवाद

प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्याख्या नियमांतर्गत त्या कालावधीत त्यांना योग्य वाटेलती कार्यवाही करेल.

(8) उप विभागीय प्राधिकरणाच्या आदेशामुळे व्यथीत कोणताही पक्ष अपिल प्राधिकरणाकडे (जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारीयांनी प्राधिकृत केलेले अपर जिल्हाधिकारी) आदेशाचे दिनांकापासून 30 दिवसाचे आंत अपिल दाखल करेल, जे अपिल दाखल केल्यापासून पुढील तीस दिवसांचे आंत अपिलावर निर्णय घेईल.

(९) या कलमांतर्गत उप विभागीय प्राधिकरण किंवा अपिल प्राधिकरण यांचे प्रत्येक आदेशासास दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच अंमल असेल आणि त्याप्रमाणेच प्रवर्तनिय असेल आणि हुकूमनाम्यातील रक्कमेची वसुली जमिन महसुलाचा थकबाकीदार म्हणून दंडनीय रक्कम वसूल केली जाईल.

(10) उप विभागीय प्राधिकरण किंवा अपिल प्राधिकरणाकडे याचीका किंवा अर्ज सादरकरण्याची प्रक्रिया आणि पध्दत विहीत केलेली असेल.

९(1) कृषी विपणन सल्लागार, विपणन व निरीक्षण संचालनालय, केंद्र शासन किंवा राज्य शासनाचा असा अधिकारी ज्यास, राज्य शासनाशी सल्लामसलत करुन केंद्र शासनाने अधिकार प्रत्यायुक्तकेले आहेत तो स्वतःच्या समावेदनाने अथवा याचिकेवर किंवा शासकीय अभिकरणाद्वारे प्राप्त संदर्भावर कलम (5) अंतर्गत स्थापित इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहार व्यासपिठाद्वारे व्यवसायाचीनोंद आचारसंहिता किंवा न्यायोचीत व्यापार पध्दतीकरिता मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन किंवा कलम (7) मधील तरतुदींचे उल्लंघन करणे आणि पावती मिळाल्यापासून 60 दिवसाचे आंत आदेशाद्वारे आणि कारणे नोंदवून तो –

अ)शेतकरी किंवाव्यापारी यांना देय रकेच्या वसुलीचेआदेश पारित करेल,

ब)कलम (11) च्या उप कलम त्(2) मध्ये दर्शविल्याप्रमाणे दंड आकारेल.

क)इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहार व्यासपिठ म्हणून प्रवर्तित असलेले अधिकार त्यास योग्य वाटेल त्या काळासाठी निलंबीत करेल अथवा रद्य करेल.

परंतू, अशा रकमेची वसूली, दंडाची आकारणी निलंबीत किंवा रद्य करण्याचाकोणताही आदेश अशा इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहार व्यासपिठावर कार्यवाही त्यांस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय काढणार नाही.

(2) उप कलम (1) अंतर्गत जारी करण्यांत आलेल्या कोणत्याही आदेशासदिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच अंमल असेलआणि त्याप्रमाणेच प्रवर्तनीय असेल आणि हुकूमनाम्यातील रक्कम वसूली जमिन महसुलाच्या थकबाकिदार म्हणून दंडनीय रक्कम म्हणून वसूल केली जाईल.

10(1) कलम (9) अन्वये जारी केलेल्या आदेशाने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ति आदेशाचे दिनांकापासून 60 दिवसांचे आंत अशा अधिका-याकडे अपिल दाखल करेलकी जो केंद्र शासनाचेसह सचिवांचे दर्जापैक्षा कमी दर्जाचा नसलेल्या आणि केंद्र शासनाने या प्रयोजनासाठी नामनिर्देशीत केलेले असेल,

परंतु,अपिलकर्ता आपला अपिल अर्ज साठ दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही परंतु एकूण नव्वद दिवसापेक्षाजास्त नाही या काळात अर्ज दाखल करु शकतो जर अपिलकर्ता अपिल वेळीच दाखल करण्याचे ठोस

कारण देवू शकला आणि त्याद्वारे अपिल प्राधिकरणाचे समाधान झााले पाहिजे.

(2) या कलमांतर्गत दाखल होणारी प्रत्येक अपिल विहीत प्रपत्रात व विहीत पध्दतीने आणि ज्या आदेशाविरुध्द अपिल दाखल करावयाची आहे त्या आदेशाच्या प्रतिसह आणि विहीत करण्यांत आले फी सह दाखल करणे आवश्यक आहे.

(3) अपिल निकाली काढण्याची कार्यपध्दती विहीत केलेली असली पाहिजे.

(4) या कलमांतर्गत दाखल केलेलीअपिलाची सुनावणी करुन अपिल नव्वद दिवसांचे आंत निकाली काढल्या जाईल.

परंतू, अपिल निकाली काढण्यापूर्वी अपिल करणा-यास त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक राहील.

## **प्रकरण – 4**

## **शास्ति / शिक्षा**

कायदाचे आणि नियमांचे उल्लंघना बाबत शास्ती

11(1) जो कोणी कलम (4) च्या अथवा त्याअंतर्गत करण्यांत आलेल्या नियमातील तरतुदिंचे उल्लंघन करीत असेल तर तो ज्या अंतर्गत शिक्षेस / शास्तिस पात्र ठरेल व त्याला दंडाचीरक्कम म्हणून पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल जी रक्कम रुपये पांच लाख एवढी वाढविता येईल आणि त्यांनतरही ज्याठिकाणी उल्लंघन सतत होत असेल तर त्यानंतर च्याप्रत्येक दिवसासाठी शिक्षा म्हणून रुपसे पांच हजर प्रति दिवस याप्रमाणे उल्लंघन चालू असेल तोपर्यंत भरावी लागेल.

(2) जर एखादी व्यक्ती जी ,स्वतः इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहार व्यापिठाचे नियंत्रण करते किंवा चालविते त्याचेद्वारे कलम (5) व (7) किंवा

त्याअंतर्गत तयार करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतूदिचे उल्लंघन करीत असेल तर ती व्यक्ति रुपये पन्नास हजार पेक्षा कमी नाही व जी रुपये दहा लाख रुपये एवढी वाढविता येईल अशा शिक्षेस पात्र ठरेल. आणि ज्याठिकाणी उल्लंघन सतत चालूच असेल तर त्यानंतरच्या प्रत्येक दिवसासाठी शिक्षा म्हणून रुपये दहा हजार प्रमि दिवस याप्रमाणे ज्या दिवसापासून उल्लंघनचालूच असेल त्याच्या पहिल्या दिवासापासून उल्लंघन चालूच असेल तोपर्यंत रक्कम भरावी लागेल.

## **प्रकरण** -5

## संकीर्ण

सूचना, मार्गदर्शन जारी करण्याबाबत केंद्र शासनाचे अधिकार

12. केंद्र शासन, या कायदातील तरतुदिंचे पालन करण्यासाठी, काही सूचना, मार्गदर्शन, आदेश किंवा मार्गदर्शक सूचना, त्यांना योग्य वाटतील तेव्हा, कोणत्याही अधिका-यांस किंवा केंद्र शासनास दुययम अधिका-यास राज्य शासन अथवा राज्य शासनास दुययक असलेल्या कोणत्याही अधिका-यास इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहार व्यापिठ किंवा कोणतीही व्यक्ति जी स्वतः इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहार व्यापिठ चालविणारी व्यक्ति किंवा व्यापारी किंवा व्यापारांचा वर्ग यांना जारी करु शकेल.

सदहेतूने केलेल्या कार्यवाहीस संरक्षण देणेबाबात

13. केंद्र शासन, राज्य शासन किंवा केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही अधिका-या विरुध्द किंवा कोणत्याही व्यक्तिविरुध्द जो या कायदाद्वारे किंवा त्याअंतर्गत बनविण्यांत आलेल्या कोणत्याहीनियमांचे पालन चांगल्या उद्येशाने करीत असेल किंवा करण्यांचे प्रयोजन असेल तर त्याचेवर वाद, अभियोग किंवा कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

कायदात असलेले अधिकार

14. या कायदाच्या कोणत्याही तरतूदी अंमलात येण्यापूर्वी कोणत्याही राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायदा व इतर कोणताही अस्तित्वात असलेल्या कायदांचा प्रभाव कोणत्याही लेखाचा प्रभाव अधिभावी अधिकार या कायदास असणार आहेत.

15. कोणत्याही दिवाणी न्यायालयाचे अधिकार क्षेत्रात वाद, अथवा कोणत्याही बाबीकरिता कायदेशीर कार्यवाही किंवा विल्हेवाट लावल्या जाणा-या कोणत्याही बाबी स्विकारणे अथवा निकाली काढण्याचा विचारार्थ स्विकारण्याचा अधिकार राहणार नाही.

दिवाणी न्यायालयाचे अधिकारास बाधा

16. रोखे बाजार आणि प्रतिभूती करार नियमन कायदा, 1956 अंतर्गत मान्यताप्राप्त समाशोधन मंडळ आणि त्याअंतर्गत होणारे व्यवहारावर या कायदाच्या कोणत्याही तरतूदींचा प्रभाव असणार नाही.

काही व्यवहारास कायदाच्या तरतूदी लागू नसल्याबाबत

17. (1) केंद्र शासनास या कायदाच्या तरतुदी लागू करणेसाठी नियमतयार तयार करण्याचे अधिकार राहतील.

नियम तयार करण्याचे केंद्र शासनाचे अधिकार

(2) विशेषतः आणि उपरनिर्दिष्ठकोणत्याही अधिकारास बाधा येणार नाही असे सर्व नियम तयार करण्याचे किंवा खालील बाबींकरिता जसे –

(अ) व्यापा-यांकरिताइलेक्ट्रॉनिकनोंदणीची प्रणाली आणि अधिसूचीत शेतकरी उत्पादनाची कलम (4) चे उप कलम (2) अंतर्गत उपलब्ध प्रणाली.

(आ) कलम (4) चे उपकलम (3) च्या तरतूदी अंतर्गत प्रदानाच्या कार्यपध्दती बाबत.

(इ) कलम (8) च्या उपकलम (1) अंतर्गत उप विभागीय प्राधिकरण अथवा अपिल प्राधिकरण यांचेकडे याचिकाकिंवा अर्ज दाखलकरावयाच्या कायर्पध्दती बाबत,

(ई) कलम (9) चे उपकलम (2) अंतर्गत फी प्रदान करण्याच्या व अपिल दाखल करण्याचे विहीत प्रपत्र् सादर करणे.

(उ) कलम (10) चे उप कलम (3) अंतर्गत अपिल निकाली काढण्याच्या कार्यपध्दती बाबत,

(ऊ) विहीत किंवा ईतर कोणतीही बाब.

18. या कायदाद्वारे केंद्र शासनाने तयार केलेले सर्व नियम किंवा त्यानंतरही तयार केलेले नियम संसदेचे सत्र चालू असतांना, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर तीस दिवसाचे कालावधीत अधिवेशनाचे एका सत्रात किंवा सलगच्या दोन किंवा सत्रांमध्ये अधिवेशनाचे सत्र संपण्यापूर्वी किंवा लगतच्या सत्रमध्ये दोन्ही सभागृहाची मान्यता मिळणे किंवा त्यामध्ये काही सुधारणा सूचविल्यास, त्याप्रमाणे नियम तयार करुन किंवा नियमांची आवश्यकता नाही असे दोन्ही सभागृहास वाटत असेल ती, या अंतर्गत तयार करण्यांत आलेल्या नियमांस दोन्ही सभागृहाचे मान्यतेनंतरच सुधारीत स्वरुपात लागू होतील. जर त्यामध्ये काही सुधारणा केल्या असतील किंवा त्याचे विलोपन केले असेल तर त्याच्या विधिग्राहयतेस कोणतीही बाधा येणार नाही .

नियमांची मांडणी करणे

19(1). या कायदाच्या तरतुदीच्या अंमलबजावणीस कोणतीही बाधा येत असल्यास, केंद्र शासन,अधिकृत राजपत्रात प्रसिध्द करुन कोणतीही तरतूद सुसंगत नाही म्हणून येणारी अडचण दूर करण्यासाठी लागू करु शकेल.

अडचणी दूर करण्याचे अधिकार

(2) या कलमांतर्गत तयार केलेले कोणतेही आदेश किंवा त्याअंतर्गत तयार केलेले / होणारे कोणतेही आदेश संसंदेचे सत्र सुरु होताच संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवण्याची तरतूद आहे.

20 (1) शेतक-यांचे उत्पादन, व्यापार आणि वाणिज्यीक (उन्नती व सुविधा) अधिनियम , 2020 याद्धारे निरसित ठरत आहे.

निरसित आणि व्यावृत्ती

(2) अधिनियम निरसित करतेवेळी या मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, त्या अधिनियमांतर्गत असलेल्या तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही

केलेली असेल अथवा ती पूर्ण करण्यांत आली असेल तर या कायद़यांतर्गत असलेल्या तत्सम तरतुदीनुसार ती पूर्ण करण्यांत आल्याचे समजण्यात येईल.

डॉ. जी.नारायण राजु
सचिव, भारत सरकार.